ePaper
HSC exams: राज्यात आजपासून बारावीची परीक्षा; कॉपी रोखण्यासाठी यंत्रणेचा वापर!

| वर्ष - 8 | अंक - 207 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज™

**आतील पानांत**
- शार्दुल ठाकूर पुन्हा एकदा चमकला!
- मॅथ्यू ब्रिट्झकेचा वर्ल्ड रेकॉर्ड
- 'आप'चा पराभव का झाला?
- दोरीने बांधून पर्यटकाला मारहाण

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 11 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## राज्याच्या राजकारणातील खळबळ उडवणारी घटना

# अपहरणाची बोंब; साडेचार तास ड्रामा!

## तानाजी सावंतांच्या मुलाचे बँकॉकला निघालेले विमान अखेर जमिनीवर उतरले

। पुणे । महाईन्यूज

**माजी मंत्री तानाजी सावंत यांचा मुलगा ऋषीराज सावंतने खासगी विमान बुक करीत दोघा मित्रांसोबत दुपारी 4.30 च्या सुमारास पुणे विमानतळावरून बँकॉकला उड्डाण केले. आपल्या मुलाच्या प्रतापामुळे तानाजी सावंत हादरले. याप्रकरणी अपहरणाचा गुन्हा दाखल होताच पुणे पोलिसांनी शोधमोहिमेला गती दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, पुणे पोलीस यांच्या समन्वयाने बँकॉकच्या दिशेने निघालेले विमान देशाच्या हद्दीत थांबवण्यात आले. रात्री नऊच्या सुमारास पुणे विमानतळावर विमान दाखल झाले. ऋषीराज आणि त्याचे दोन मित्र पुण्यात परतले.**



ऋषीराज तानाजी सावंत, प्रवीण प्रदीप उपाध्याय, संदीप श्रीपती वसेकर हे तिघेही मित्र असून, त्यांनी एकाच महाविद्यालयात शिक्षण घेतले आहे. ऋषीराज माजी मंत्री तानाजी सावंत यांचा लहान मुलगा आहे. तीनही मित्रांनी काही दिवसांपूर्वीच दुबई ट्रीप केली होती. त्यानंतर त्यांनी बँकॉकला जाण्याचा प्लॅनिंग केले.

मात्र, तिकडे जाण्यासाठी कुटूंबिय परवानगी देणार नाही, याची कल्पना ऋषीराजला होती. त्यामुळे त्याने परस्परिरत्या कोणालाही माहिती न देता पुणे-बँकॉक खासगी विमान बुक केले. त्यासाठी ऋषीराजने लाखो रूपये आरटीजीएसद्वारे विमान कंपनीला दिल्याचे उघडकीस आले आहे. तिन्ही मित्रांनी 10 फेब्रुवारीला संध्याकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास खासगी विमानातून बँकॉकच्या दिशेने उड्डाण केले. दरम्यान, मुलाने परस्परिरत्या खासगी विमान बुक करीत लाखो रुपये पैसे खर्च केले. त्यासोबत त्याच्या मित्रांनाही सोबत नेल्याचा राग कुटूंबियाला आला. त्यामुळे माजी मंत्री तानाजी सावंत यांच्या संस्थेतील एकाने मुलाचे नव्हेतून अपहरण झाल्याची तक्रार सिंहगड पोलीस ठाण्यात दाखल केली. त्यानंतर तानाजी सावंत आणि त्यांचा मोठा मुलगा गिरीराज यांनी पुणे पोलीस आयुक्तालयात धाव घेउन वरिष्ठ पोलीस अधिकारी, एअर ट्राफिक कंट्रोल यासह इतरांसोबत संवाद सुरू केला.

### विमान प्रवासासाठी 68 लाख...

विमानातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसह क्रूची सर्व माहिती फ्लाईट मॅनिफेस्टद्वारे दिली जाते. त्याला पॅसेंजर मॅनिफेस्ट किंवा पॅसेंजर लिस्ट असे संबोधले जाते. ज्यामध्ये फ्लाइटमधील प्रवासी आणि क्रूबद्दल महत्वाची माहिती असते. 10 फेब्रुवारी रोजी संध्याकाळी 4 वाजून 30 मिनिटांनी विमानाने पुण्याहून बँकॉकच्या दिशेने उड्डाण केले होते यातून स्पष्ट झाले आहे. दरम्यान, खासगी विमान बुक करण्यासाठी ऋषीराज सावंतने तब्बल 68 लाख रुपये मोजल्याचे समजते.

## माजी मंत्री छगन भुजबळ स्पष्टच बोलले..!

## गोपीनाथ मुंडेंनी दिली होती नवा पक्ष काढण्याची 'ऑफर'


। मुंबई । महाईन्यूज

**भाजप नेत्या आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी गोपीनाथ मुंडेंवर प्रेम करणाऱ्या लोकांचा एक पक्ष उभा राहील, असे वक्तव्य नुकतेच केले. यासंदर्भात बोलताना अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांनी गोपीनाथ मुंडे यांनी नवा पक्ष काढण्याची ऑफर आपल्याला दिली होती, असे स्पष्टपणे सांगितले.**

छगन भुजबळ म्हणाले की, मला गोपीनाथ मुंडे म्हणाले होते की, भुजबळ साहेब, आपण एक वेगळा पक्ष काढू. मला स्वतः ते म्हणाले होते. तुम्ही, मी, गणपतराव देशमुख आणि रामदास आठवले आणि आणखीन आपल्याबरोबर येतील. मी पण हो बोललो होतो. यावर एक वेळ नाही, तर दोन वेळा चर्चादेखील झाली होती. मीसुद्धा होकार दिला होता. मात्र, त्यानंतर पुढे काय झाले ते मला माहीत नाही. पण त्यानंतर त्यांनी तो विषय सोडून दिला.

**पंकजा मुंडे काय म्हणाल्या?**

गोपीनाथ मुंडे यांच्यावर प्रेम करणाऱ्या लोकांची संख्या एवढी मोठी आहे की ,एकत्रित केल्यास एखादा पक्ष उभा राहील. गोपीनाथ मुंडे यांच्यावर प्रेम करणारे हे सर्व लोक त्यांची मुलगी म्हणून माझ्याबरोबर जोडले गेलेले आहेत.



लोक गुणांचा वारसा स्वीकारतात. गुणांवर प्रेम करतात. पण गोपीनाथ मुंडे यांच्यावर प्रेम करणाऱ्यांचा पक्ष उभा आहे. भाजपच्या जन्मापासून काम करून त्यांनी हा पक्ष उभा केला आहे, असं पंकजा मुंडे यांनी म्हटले होते.

### कितपत यशदायी?

स्वतंत्र पक्ष काढायचा ते कोणीही काढू शकतो. ज्याप्रमाणे पंकजा मुंडे म्हणत आहेत, त्यानुसार तो मोठा पक्ष असू शकतो. पण माझे एक म्हणणे आहे की, एका समाजावर पक्ष काढणे आणि त्यामध्ये यश मिळवणे ते कितपत यशदायी आहे याची मला काही कल्पना नाही, मग तो कोणताही समाज असो. त्यांनी काही अभ्यास केला असेल. पण त्यांनी म्हटले म्हणून लगेचच त्या पक्ष काढतील असे मला वाटत नाही. गोपीनाथ मुंडे यांना मानणारा मोठा वर्ग आहे हे त्यांचे म्हणणे

# अपार्टमेंटधारकांची डोकेदुखी होणार कमी!

## गृहविभागाकडे प्रस्ताव: मेंटेनन्ससाठी न्यायालयाची गरज नाही

।पुणे ।महाईन्यूज। प्रतिनिधी।

**पुणे - अपार्टमेंटमधील एखादा सदनिकाधारक देखभाल-दुरुस्ती (मेंटेनन्स) खर्च देत नसेल, तर पूर्वी न्यायालयाचे दरवाजे ठोठावावे लागत होते. आता मात्र तसे करण्याची वेळ येणार नाही. कारण अशा सभासदांकडून मेंटेनन्स वसुली करण्यासाठी सहकार खात्याच्या रजिस्ट्रारकडेही (निबंधक) अर्ज करता येईल आणि वसुली आदेश प्राप्त करून घेता येतील. त्यामुळे अपार्टमेंटधारकांची डोकेदुखी कमी होणार आहे. मात्र या प्रस्तावास मान्यता देण्यास सरकारला वेळ मिळत नसल्याचे समोर आले आहे.**



### ...असे असेल कामकाज

1) अपार्टमेंटमधील तक्रारींचे निवारण करण्यासाठी तक्रार निवारण पॅनेल सुरू करण्याची शिफारस. 2) या पॅनेलमध्ये अधिकाऱ्यांसह एक वकील आणि एक सनदी लेखापालाचा सदस्य म्हणून समावेश 3) आर्थिक स्वरूपाची तक्रार आल्यानंतर. 4) ती सनदी लेखापालाकडे पाठविणार. 5) कायदेशीर बाबीच्या स्वरूपाची तक्रार वकिलाकडे पाठविणार. 6) या पॅनेलच्या माध्यमातून तक्रारीची छाननी करून निर्णय घेतला जाणार. 7) सभासदांचे समाधान झाले नाही, तर त्यांना सहकार न्यायालयात अपील दाखल करता येणार, अशी अहवालात शिफारस

महाराष्ट्र अपार्टमेंट ॲक्ट १९७० (महाराष्ट्र वेश्म मालकी अधिनियमात) मध्ये बदल करण्याची शिफारस सहकार आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने राज्य सरकारला केली आहे. या कायद्यात बदलासंदर्भात अनेक शिफारशी केल्या आहेत. त्यापैकी वसुलीचे अधिकार रजिस्ट्रारला देण्याच्या महत्त्वपूर्ण शिफारशीचा त्यामध्ये समावेश आहे. याचा अहवाल गृहनिर्माण विभागाकडे सहा महिन्यांपासून प्रलंबित आहे. त्यास मान्यता मिळाली, तर अपार्टमेंटमधील रहिवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**अनेक बदलाच्या शिफारशी**

अपार्टमेंट कायद्यातील तरतुदीनुसार, एखादा सभासद मेंटेनन्स देत नसेल, तर सध्याच्या कायद्यातील तरतुदीनुसार न्यायालयात अर्ज करावा लागतो. ही सर्व प्रक्रिया खर्चिक आणि वेळखाऊ आहे. त्याचा त्रास अन्य सभासदांना सहन करावा लागतो. मध्यंतरी राज्य सरकारने या कायद्यात बदल करण्यासाठी सहकार आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली १२ जणांची सदस्यीय समिती नेमली होती. या समितीने कायद्याचा अभ्यास करून त्यामध्ये निवडणुकांपासून मेंटेनन्सपर्यंतच्या तरतुदीमध्ये अनेक बदलाच्या शिफारशी केलेल्या आहेत.

**... तर अडचणी दूर होणार!**

दोन वर्षांपूर्वी राज्य सरकारने अपार्टमेंट कायद्यातील तरतुदीमध्ये बदल करीत अपार्टमेंटमधील रहिवाशांच्या तक्रार निवारणाचे अधिकार सहकार आयुक्तांना (रजिस्ट्रार) दिले होते; परंतु त्या अधिकाराचे विक्रेंद्रीकरण करण्याबाबतचा आदेश काढण्याचा विसर गृहनिर्माण विभागाला पडला.


त्यामुळे दोन वर्षे होऊनही या बदलाची प्रभावी अंमलबजावणी होऊ शकली नाही. आता सहकार आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समितीने या कायद्यातच बदल करण्याची शिफारस अहवालात केली आहे. त्यास मान्यता मिळाल्यास या अडचणी दूर होणार आहेत, असे सहकार विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

# आरटीई 25 टक्के प्रवेशाची ऑनलाइन सोडत जाहीर!

## शनिवारपासून पालकांना मिळणार प्रवेशाचा संदेश

।पुणे ।महाईन्यूज ।प्रतिनिधी

**शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांमधील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशासाठी आलेल्या अर्जाची ऑनलाइन सोडत (लॉटरी) सोमवारी विद्यार्थ्यांच्या हस्ते काढण्यात आली. राज्यातील आठ हजार ८६३ शाळांमधील एकूण एक लाख नऊ हजार १११ जागांसाठी तीन लाख पाच हजार १५९ बालकांचे अर्ज आले आहेत. प्राथमिक शिक्षण विभागातर्फे ऑनलाइन सोडत जाहीर झाली असली तरीही पालकांना प्रवेशाच्या निवड यादीसाठी शनिवारपर्यंत (ता.१५) वाट पहावी लागणार आहे.**




बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ (आरटीई) नुसार खासगी शाळांमधील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशाची ऑनलाइन सोडत सोमवारी जाहीर करण्यात आली. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या (एससीईआरटी) सभागृहात नवीन मराठी शाळेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत चिठ्ठ्या काढून ही सोडत काढण्यात आली.

यावेळी राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, शिक्षण संचालक (योजना) महेश पालकर, 'बालभारती'चे संचालक कृष्णकुमार पाटील, एससीईआरटीचे संचालक राहुल रेखावार उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी प्रतिनिधिक स्वरूपात चिठ्ठ्या उचलल्यानंतर प्रत्यक्ष ऑनलाइन सोडत प्रक्रियेस सुरवात करण्यात येते.

विद्यार्थ्यांनी चिठ्ठ्या उचलून काढलेल्या नंबरच्या सहाय्याने काही गुणसूत्र वापरून राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्रामार्फत (नॅशनल इन्फर्मेटिक्स सेंटर- एनआयसी) सोडत काढली जाते. त्यासाठी तीन-चार दिवसांचा अवधी लागतो. साधारणत: शुक्रवार (ता. १४) ते शनिवार (ता.१५) पर्यंत एनआयसीमार्फत ऑनलाइन सोडतीचे तांत्रिक काम पूर्ण होईल. त्यानंतर येत्या शनिवारपासून (ता.१५) निवड यादीत असलेल्या बालकांच्या पालकांना प्रवेशाबाबतचे संदेश अर्जात नोंदविलेल्या मोबाईल क्रमांकावर पाठविण्याची प्रक्रिया सुरू होईल, असे गोसावी यांनी सांगितले.

**सचिंद्र प्रताप सिंह,**
**राज्य शिक्षण आयुक्त**

आरटीई प्रवेश प्रवेश नाकारणाऱ्या शाळांविरोधातही पालकांनी निर्भयपणे तक्रारी कराव्यात. आरटीईअंतर्गत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता नववीत गेल्यानंतर शाळांकडून थेट ट्रान्स्फर सर्टिफिकेट' (टीसी) दिले जात असल्यास, अशा पालकांनीही तक्रार नोंदविण्यासाठी पुढाकार घ्यावा. शिक्षण विभागातर्फे निश्चितच पालकांच्या तक्रारींची दखल घेतली जाईल.”

### शिक्षण आयुक्तांचा सल्ला

'आरटीईअंतर्गत २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशाची प्रक्रियाही पूर्णपणे पारदर्शकच होत आहे. त्यामुळे, पालकांनी कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये. आरटीई २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश देतो, असे कोणी एजंट सांगत असल्यास, त्याची तक्रार त्वरित संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांकडे करा. त्यांच्या कठोर कारवाई करण्यात येईल.



## पालिकेच्या इतिहासातील मोठी कारवाई

# 1 हजार 511 अतिक्रमणे हटविली

### 1 कोटी 20 लाख 72 हजार चौरस फुटांचे बांधकाम जमीनदोस्त

**। पिंपरी- चिंचवड ।प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**चिखली येथील कुदळवाडी भागात आज सलग तिसऱ्या दिवशीही अतिक्रमण कारवाई करण्यात आली. ७७ एकर क्षेत्रामध्ये झालेल्या या कारवाईदरम्यान आज एकूण ६८२ बांधकामे निष्कासित करण्यात आली. शहरातील नियोजित विकास आरक्षणे आणि नागरिकांच्या सुविधांसाठी असलेल्या जागेवरील अनधिकृत पत्राशेड, कारखाने, गोदामे, भंगार दुकाने तसेच अनधिकृत बांधकामे हटविण्यासाठी ही कारवाई करण्यात येत असून यापुढेही ती चालू राहणार आहे. दरम्यान गेल्या तीन दिवसांत १ हजार ५११ अतिक्रमणे हटविली आहेत.**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग आणि क्षेत्रीय धडक कारवाई पथकांमार्फत करण्यात आलेल्या या कारवाईमध्ये सोमवारी झालेल्या कारवाईमध्ये ३३ लाख ५८ हजार १३० चौरस फूट बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. त्यामध्ये ६८२ बांधकामांचा समावेश होता. तीन दिवसात तब्बल 276 एकरावर असलेली अनधिकृत बांधकामे हटविण्यात आली आहे

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आणि महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या कारवाईमध्ये अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उपआयुक्त मनोज लोणकर, क्षेत्रीय अधिकारी राजेश आगळे, सुचेता पानसरे, अमित पंडित, किशोर ननवरे, उमेश ढाकणे, अजिंक्य येळे, शितल वाकडे, श्रीकांत कोळप यांच्यासह कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता सहभागी झाले होते. सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, अतिरिक्त पोलिस आयुक्त वसंत परदेशी यांच्या अधिपत्याखाली पोलीस उपआयुक्त स्वप्ना गोरे, डॉ. शिवाजी पवार, संदीप डोईफोडे, विवेक पाटील यांच्या नेतृत्वाखाली या परिसरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

या कारवाईमध्ये महापालिका अतिक्रमण धडक कारवाई पथकामधील ४ कार्यकारी अभियंते, १६ उपअभियंते, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे १८० जवान, ६०० पोलीस आणि मजूर कर्मचारी सहभागी झाले होते. १६ पोकलेन, ८ जेसीबी, १ क्रेन आणि ४ कटर यांचा वापर निष्कासन कारवाईमध्ये करण्यात आला. शिवाय ३ अग्निशमन वाहने आणि २ रुग्णवाहिका देखील येथे तैनात करण्यात आल्या होत्या. महापालिका यंत्रणेसह पोलीस, वीज वितरण कंपनीचे अधिकारी कर्मचारी देखील सहभागी झाले होते.

### अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त

पिंपरी चिंचवड महापालिकेने ८ ते १० फेब्रुवारीपर्यंत 276 एकर क्षेत्रावर असलेली अनधिकृत बांधकामे हटविली. आजवर १ कोटी २० लाख ७२ हजार चौरस फूट अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त करण्यात आले आहे.सलग तीन दिवसांत १ हजार ५११ अतिक्रमणे हटविली आहेत.



# एक फुल अन् दोन हाफ.. खोटारड्यांचा सुपडा साफ!

**दिल्ली विधानसभा निवडणुकीचे मतदान सुरू असतानाच काँग्रेसचे नेते राहुल गांधी, शरद पवार गटाच्या सुप्रियाताई सुळे आणि उद्धव ठाकरे गटाचे संजय राऊत पंतप्रधान, गृहमंत्री, निवडणूक आयोग यांच्या विरोधात टीकेची झोड उठवत होते. त्यांना जणू कल्पनाच आली होती, की या निवडणुकीत त्यांचा सुपडा साफ होणार !**




.. आणि झालेही तसे ! दिल्ली सगळीकडे कमळच कमळ फुलले. काँग्रेस पक्षाची नामोनिशाणी उरली नाही, शरद पवार गटाच्या अस्तित्वाचा प्रश्नच नव्हता. पण, अरविंद केजरीवाल यांचा पक्ष नरेंद्र मोदी यांच्याविरोधी स्थापन झालेल्या 'इंडी' आघाडीचा प्रमुख घटक पक्ष, त्यात सहभागी असलेले अन्य दोघांचे पक्ष लक्षात घेतले, तर भारतीय जनता पार्टीने या तिघांसाठी अक्षरशः धुव्वा उडवला आहे, हे मान्य करावेच लागेल.

### भाजपाचा वारू चौफेर उधळला..

सध्या संपूर्ण देशातील वातावरण नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पक्षाला अनुकूल असेच आहे. एक एक राज्य ते काबीज करत चालले आहेत. काही मोजकी राज्ये सोडली, तर सर्वत्र भाजपाची सत्ता आहे आणि देशात आता एक छत्री अंमल येतो, की काय अशी कल्पना येऊ शकते. यासाठी आपण थोडे इतिहासात डोकावू या.

### इंदिराजींचा विक्रम मोदी मोडणार

काँग्रेसच्या नेत्या इंदिरा गांधी यांच्या काळात देशातील बहुतांश राज्यांत काँग्रेसची सत्ता होती. त्या वेळचा विक्रम आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात मोडला गेला आहे. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत भाजपला आसेतू हिमाचल राज्य करायचे आहे; परंतु भाजपाला पश्चिम बंगाल, केरळचा अडथळा आहे. तो अडथळा दूर करण्याचे आव्हान भाजपपुढे आहे. येत्या काही दिवसात तेथेही निवडणुका होतील, आणि जनता काय कौल देते, हे त्यावेळी उचित ठरेल.

### तब्बल 27 वर्षानंतर सत्ता

भाजपाने तब्बल२७ वर्षानंतर दिल्लीची सत्ता मिळवली. आता देशात १९ राज्ये आणि काही केंद्रशासित प्रदेशात सत्ता मिळाल्याने सर्वाधिक राज्ये भाजपच्या ताब्यात आहेत. दिल्लीच्या निवडणुकीत यश मिळाल्यानंतर आता केरळ आणि पश्चिम बंगालवर भाजप अधिक लक्ष केंद्रीत करील, यात शंका नाही.

दिल्लीत मिळालेल्या यशाची पुनरावृत्ती भाजपा केरळ आणि पश्चिम बंगालमध्ये करू शकेल का? केरळमधील राजकारण प्रामुख्याने डावी लोकशाही आघाडी (एलडीएफ) आणि संयुक्त लोकशाही आघाडी (यूडीएफ) यांच्यात फिरत राहिले आहे. 'एलडीएफ'वर प्रामुख्याने सीपीआय (एम)चे वर्चस्व राहिले आहे, तर काँग्रेस हा 'यूडीएफ'मध्ये मुख्य पक्ष राहिला आहे. भाजपने येथे आपली पकड मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु आतापर्यंत केरळमध्ये भाजपचे सरकार कधीही स्थापन झालेले नाही. २०१६ मध्ये भाजपचा पहिला आमदार जिंकला; परंतु २०२१ च्या निवडणुकीत पक्षाला एकही जागा जिंकता आली नाही. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतही भाजपला फारसा फायदा झाला नाही; परंतु काँग्रेस आणि डाव्यांमधील वाढत्या मतभेदांचा फायदा भाजपला होऊ शकतो, हे भाजपाच्या नेत्यांनाही माहित आहे.

### पश्चिम बंगालमध्ये हिंदुत्वाचा मुद्दा ?

पश्चिम बंगालमध्ये हिंदुत्वाचे राजकारण आणि 'एनआरसी-सीएए' सारखे मुद्देही भाजपाच्या बाजूने जाऊ शकतात. भाजपा बंगालमध्ये एक मजबूत संघटना उभारण्यात यशस्वी झाला आणि ममता बॅनर्जी यांच्या पक्षात अंतर्गत कलह निर्माण झाला, तर पुढची निवडणूक कठीण असू शकते. सर्वात मोठे आव्हान म्हणजे तृणमूल काँग्रेसची मतपेढी अजूनही मजबूत आहे. ममता यांची प्रतिमा बंगालमध्ये खूप प्रभावी आहे. दिल्ली जिंकल्यानंतर, भाजपचे पुढील लक्ष्य दक्षिण आणि पूर्वेकडील राज्ये, विशेषतः केरळ आणि बंगाल असू शकते, कशा पद्धतीने भाजपाची बैठकही झालेली आहे.

### मोदी शाह यांची यशस्वी रणनीती

पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांची रणनीती नेहमीच दीर्घकालीन राजकारणावर केंद्रित राहिली आहे. जिथे ते हळूहळू त्यांचा पाठिंबा वाढवतात आणि नंतर सत्तेपर्यंत पोहोचतात. दिल्लीत २७ वर्षांनी भाजपचे सरकार स्थापन होत आहे. त्यामुळे केरळ आणि पश्चिम बंगालमध्येही पक्ष आपले ध्येय पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल. दोन्ही राज्यांची राजकीय परिस्थिती वेगळी असली, तरी जर भाजपने योग्य रणनीती अवलंबली, तर येत्या काळात पश्चिम बंगाल आणि केरळमध्ये सत्ता परिवर्तन होण्याची शक्यता नाकारता येत नाही.


### बिहारच्या निवडणुकांवर परिणाम

दिल्ली विधानसभा निवडणुकीचे निकाल नेहमीच राष्ट्रीय राजकारणावर परिणाम करतात आणि या वेळीही त्याचा बिहार विधानसभा निवडणुकीवर परिणाम होऊ शकतो. बिहारचे राजकारण आणि दिल्लीचे राजकारण निश्चितच वेगळे आहे. परंतु, या दोघांना जोडणारे अनेक घटक आहेत. बिहारमधील लोक मोठ्या संख्येने दिल्लीत राहतात. दिल्लीत भाजपा ज्या पद्धतीने विजय मिळवत आहे, त्यावरून हे स्पष्ट होते, की त्यात बिहारी लोकांचीही मोठी मते आहेत. दिल्लीच्या विजयाचा बिहारमध्ये निश्चितच परिणाम होऊ शकतो. दिल्लीत भाजपने सरकार स्थापन केले आहे. त्यामुळे बिहारमध्येही भाजपची स्थिती मजबूत होऊ शकते.

### काँग्रेसची घेतलेली ताकद

दिल्लीत काँग्रेस पूर्णपणे संपली आहे. सलग तिसऱ्या निवडणुकीत काँग्रेसला एकही जागा जिंकता आली नाही. काँग्रेसने शहाणपणाने निर्णय घेतले नाहीत, तर बिहारमध्ये काँग्रेसची हालत फारच वाईट होईल.

## अखंड रामसेवा ज्याला लाभली..!



**अध्यात्म**

अखंड रामसेवा ज्याला लाभली । धन्य धन्य त्याची माउली ॥ स्वार्थरहित रामसेवा । याहून दुजा लाभ न जीवा ॥ वाचेने भगवंताचे नाव । कायेने भगवंतसेवा । चित्ती भगवंताचे ध्यान । आपण रहावे रामार्पण । याहून अन्य सेवा । कोणतीही नाही जाण ॥

जे जे दिसते ते ते नासते । हा बोध घेऊनि चित्ती । सज्जन लोक जगी वर्तती । तैसे तुम्ही आता वागा जगात ॥ मुलां-बाळांस सांभाळून राहावे । प्रपंचात उदास न व्हावे ॥ प्रपंचाची उपाधि । आता मनात न आणावी ॥

उपाधिवेगळे झाला । ऐसे ऐकू द्यावे मला ॥ उपाधीत राहिला । परि चित्ताला न वास दिला । ऐसे ठेवा मनी । राम आणावा ध्यानीं । आता यापरतें हित । नाहीं दुसरे जगांत । हा माझा बोल । न मानावा फोल ॥

आता रामा तुझा झालो । कर्तेपणातून मुक्त झालों । ऐसें आणावे मनांत । शक्य तितके राहावे नामात । याहून दुसरें न आणावे मनांत ॥ लौकिकांतील मानापमान । यांचे सोडावें उदक । ध्यानीं आणावा रघुनंदन एक ॥

बायको-मुलांबाळांत राहावे । चित्त रामाकडे ठेवावें । होईल तेवढे नाम घ्यावें ॥ अंतरी परमात्मा त्यास । ठेवून साक्ष भावे भजावे रघुनाथास । न सोडावा मनाचा धीर । मागे आहे रघुवीर ॥

वृद्धपण आलें । शरीर क्षीण झालें । तरी आपण अभिमान घेऊनच राहिले । त्यास सोडावें दूर । प्रपंचांत वृद्धपणीं न पाहावें । मुलांस मार्ग दाखवून सुखी राहावें । औषध पथ्यपाणी सांभाळावें । पण दु:खी कष्टी कधीं न व्हावें ॥

शरीरसंपत्ति क्षीण झाली । तरी वृत्ति क्षीण नाही बनली ॥ जोवर देहाची संगति । तोवर 'मी-माझें' ही वृत्ति ॥ आता वृत्ति राखावी रामापाशी । दुजी उठू न द्यावी त्यापरती ॥ आजवर जें घडलें । ते प्रापंचिक, पारमार्थिक असो भले । तें रामकृपेने झाले । हे ठेवावे चित्तीं । आता न सोडावा रघुपति ॥

सर्व कर्ता राम हा भरवसा ठेवावा ठाम । मग काळजींचे उरलें नाहीं काम । हे सर्व जुळतें म्हणतां राम राम ॥ तरी सर्वांनीं घ्यावे रामनाम । व्हावें परमात्म्याचे आपण । कृपा करील रघुवीर ॥

**बोधवचन:-** मागणे तुम्हा एकच पाही। नामावाचून दूर कधीं न राही॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयमधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# लाडक्या बहिणींकडील कारची तपासणी

## अंगणवाडी सेविका घरोघरी जाऊन करणार पाहणी

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची घोषणा झाल्यावर त्याचे मतात झालेले परिवर्तन आणि सरकारी तिजोरीवर पडलेला बोजा यातून मार्ग काढण्यासाठी आता लाडक्या बहिणींच्या संपत्तीचा तपास करायला सरकारने सुरुवात केली आहे. आजपासून या मोहिमेची राज्यव्यापी अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे.**



कुटुंबात कार असणाऱ्या लाभार्थी महिलांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात येणार आहे. आजपासून (दि. १०) पडताळणीसाठी बालविकास प्रकल्प अधिकारी, परिवेक्षिका, अंगणवाडी सेविका घरोघरी जाऊन पाहणी करणार आहेत. राज्याच्या महिला व बालविकास कल्याण विभागाचे सचिव अनुपकुमार यांनी गेल्या सोमवारी (दि. ३) राज्यातील सर्व जिल्हा महिला व बालविकास कल्याण अधिकाऱ्यांची व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून बैठक घेतली होती. त्यावेळी त्यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थींच्या घरोघरी जाऊन कार आहे का? याची पाहणी करण्याच्या सूचना केल्या होत्या. याबाबत राज्य सरकारच्या वतीने जिल्हा प्रशासनाला यादी पाठविण्यात आली असून, त्या पुणे जिल्ह्यात ७५ हजार १०० लाभार्थी महिलांच्या कुटुंबात कार असल्याचे समोर आले आहे. या सगळ्यांच्या घरोघरी जाऊन तपासणी करण्यात येणार आहे. सोमवारपासून याची सुरुवात होत आहे.याद्यांनुसार प्रत्येक जिल्ह्यात बालविकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षिका आणि अंगणवाडी सेविका घरोघरी जाऊन पडताळणी करणार आहेत. यानंतर ही यादी तयार करून महिला व बालकल्याण विभागाला पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर ही यादी राज्य सरकारला पाठविण्यात येणार आहे. यात तथ्य आढळल्यास तत्काळ योजनेतून नाव वगळण्यात येणार आहे. कार असलेल्या महिलांनी स्वतःहून लाभ सोडावा, असेआवाहन राज्य सरकारने केले होते. त्याला अगदी कमी प्रतिसाद मिळाला. त्यामुळे पडताळणी केली जात आहे. लाडक्या बहिणीचा लाभ नको असेल तर तालुक्यातील बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, जिल्ह्याचे महिला व बालकल्याण अधिकारी, जिल्हा महिला बालविकास अधिकारी कार्यालय या ठिकाणी लेखी अर्ज करत येणार आहे. याशिवाय HTTPS://LADA-KIBAHIN. MAHARASHTRA.GOV.IN या संकेतस्थळावर तक्रार निवारण हा पर्याय निवडून त्यावरूनही अर्ज करण्याची सोय उपलब्ध आहे. कुटुंबातील सासरे, दीर अथवा इतरांच्या नावावर कार असेल आणि लाभार्थी महिला पती, मुलांसोबत विभक्त राहत असेल, तर त्यांना लाडकी बहीण योजनेचा लाभ सुरू राहणार असल्याचे महिला व बालविकास विभागाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. कुटुंबात कार असणाऱ्या लाभार्थी महिलांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात येणार आहे राज्याच्या महिला व बालविकास कल्याण विभागाचे सचिव अनुपकुमार यांनी गेल्या सोमवारी (दि. ३) राज्यातील सर्व जिल्हा महिला व बालविकास कल्याण अधिकाऱ्यांची व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून बैठक घेतली होती. त्यावेळी त्यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थींच्या घरोघरी जाऊन कार आहे का?

### विभक्त बहिणींना सुरु राहणार

याची पाहणी करण्याच्या सूचना केल्या होत्या. याबाबत राज्य सरकारच्या वतीने जिल्हा प्रशासनाला यादी पाठविण्यात आली असून, त्या पुणे जिल्ह्यात ७५ हजार १०० लाभार्थी महिलांच्या कुटुंबात कार असल्याचे समोर आले आहे. या सगळ्यांच्या घरोघरी जाऊन तपासणी करण्यात येणार आहे. सोमवारपासून याची सुरुवात होत आहे.याद्यांनुसार प्रत्येक जिल्ह्यात बालविकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षिका आणि अंगणवाडी सेविका घरोघरी जाऊन पडताळणी करणार आहेत. यानंतर ही यादी तयार करून महिला व बालकल्याण विभागाला पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर ही यादी राज्य सरकारला पाठविण्यात येणार आहे. यात तथ्य आढळल्यास तत्काळ योजनेतून नाव वगळण्यात येणार आहे.

---

# गणपती विसर्जन करु देत नाही हेच तुमचं हिंदुत्व?

## ठाकरेंनी मोदींच्या कुंभमेळ्यातील स्नानावरुन टीका केली

। संगमनेर ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपावर टीका केली आहे. माघी गणेशोत्सवात राज्य सरकारने नोटिसा बजवल्या. त्यावरुन उद्धव ठाकरे यांनी मोदींवर टीका केली. उद्धव ठाकरे म्हणाले, एकीकडे महाकुंभ सुरु आहे. त्यात सर्वजण डुबकी मारत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डुबकी मारली. पण पीओपी गणेश मूर्तींचं विसर्जन होणार नाही, अशी नोटीस सरकार बजावत आहे.**





महाकुंभात जाऊन अनेक जण डुबकी मारत आहेत. आमच्या पंतप्रधानांनीही डुबकी मारली. पण एकीकडे गणपती मंडळांच्या अध्यक्षांचं पत्र आलं आहे. माघी गणेशोत्सवात ज्यांनी पीओपीच्या मूर्ती स्थापन केल्या होत्या त्यांचं विसर्जन करायचं नाही अशी त्यांना नोटीस आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी कुंभमेळ्यात डुबकी मारतात आणि गणपतीचं विसर्जन करायचं नाही? हे कुठलं हिंदुत्व आहे?पीओपी मूर्तीमुळे प्रदूषण होत असेल तर शाडूच्या मूर्ती बनवा हे योग्य आहे मी समजू शकतो. पण शाडूची माती देणार कोण? मूर्ती तयार झाली असेल तर पर्याय काय? विसर्जनाच्या आदल्या दिवशी नोटिसा देणार असाल तर तुमचं हिंदुत्व तरी काय आहे? तलावांमध्ये विसर्जन करायला बंदी घालण्यात आली आहे. काही ठिकाणी तर विसर्जन केलेल्या मूर्ती बाहेर काढण्यात आल्या. काही ठिकाणी हे सरकार नतद्रष्टपणे वागलं आहे. मी आज हे सांगतो कुठे कुठे मूर्ती बाहेर काढून ठेवल्या आहेत हे बघा. त्यानंतर पुढे काय करायचं ते ठरवू. प्रवचनं देणं सोपं आहे, पण तू तसा वागतोस का? हे महत्त्वाचं आहे.आपल्याकडे म्हटलं जातं की बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले. आपल्याकडे नुसतंच बोलतात आणि कृती काही नाही. काही लोक खूप छान बोलतात, एका उंचीवर नेतात पण वागणं भलतंच असतं. मग परमहंस म्हणाले.

### दसरमुक्त संकल्पना आम्ही राबवली

हे बघ निरभ्र आकाश असतं ना त्यात गिधाडं किंवा घारी उंच उडतात. तरीही इतक्या उंचीवर जाऊन त्यांचं लक्ष जमिनीवरच्या कुजक्या आणि सडलेल्या मांसाकडे असतं तशी काही माणसं असतात. मी हे कुणाला उद्देशून बोललो नाही असंही उद्धव ठाकरेंनी स्पष्ट केलं.शाळेमध्ये सुधारणा झाली पाहिजे म्हणत होते, मुंबई महापालिकेच्या शाळा आपण सुधारल्या की नाही? हे जाऊन तुम्ही बघा. सरकारने ते स्वीकारलं नाही. मुलांच्या पाठीवरचं ओझं कमी झालं पाहिजे हे बाळासाहेबांचं स्वप्न होतं ते मी २०१४ ला करुन दाखवलं. मी ८ वी, ९ वी आणि १० वीच्या मुलांच्या हाती टॅबच दिला, त्यात पाठ्यपुस्तकं होती. प्रश्नपत्रिका होत्या, ई लर्निंग कोर्स आला असंही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.

# केजरीवालांच्या ‘आप’चा पराभव का झाला?

## राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी सांगितली कारणे

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. दिल्लीत भारतीय जनता पक्षाला मोठे यश मिळाले. यादरम्यान जन सूरज पक्षाचे प्रमुख आणि निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी या निवडणूक निकालावर प्रतिक्रिया देताना अरविंद केजरीवाल यांच्या पक्षाच्या पराभवाची कारणे काय होती? याबद्दल भाष्य केले आहे. मद्य धोरण घोटाळा प्रकरणात जामीन मिळाल्यानंतर अरविंद केजरीवाल यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणे ही एक मोठी चूक होती, ज्याची पक्षाला मोठी किंमत पक्षाला मोजावी लागली असं मत किशोर यांनी व्यक्त केले आहे.**




केजरीवाल यांनी गेल्या काही वर्षांमध्ये बदललेली राजकीय भूमिका जसे की, त्यांनी इंडिया आघाडीमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला मात्र दिल्ली निवडणूक एकट्याने लढले. यामुळे देखील दिल्ली विधानसभा निवडणुकीतील आमच्या खराब कामगिरीत भर पडली, असे प्रशांत किशोर यांनी इंडिया टुडे टीव्हीशी बोलताना सांगितले.दिल्लीत आपच्या मोठ्या पराभवाचे पहिले कारण हे गेल्या १० वर्षांमधील सत्ताविरोधी भावना (ANTI-INCUMBENCY) हे आहे. दुसरे कारण आणि कदाचित आपची सर्वात मोठी चूक ही केजरीवाल यांचा राजीनामा देणे ही होती. मद्य धोरण प्रकरणात अटक झाल्यावर त्यांनी राजीनामा द्यायला हवा होता. मात्र, जामीन मिळाल्यानंतर आणि निवडणुकीच्या तोंडावर दुसऱ्याची मुख्यमंत्री म्हणून नेमणूक करणे ही मोठी धोरणात्मक चूक ठरली," असे निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर म्हणाले. दिल्ली विधानसभा निवडणुकीत विजय मिळवत भारतीय जनता पक्ष २७ वर्षांनंतर राजधानीत सत्तेत आला आहे. भाजपने ७० पैकी ४८ जागांवर विजय मिळवला. तर आप ज्यांनी २०२० मध्ये ६२ आणि २०१५ मध्ये ६७ जागा जिंकल्या होत्या यंदा मात्र अवघ्या २२ जागा जिंकू शकला. तर काँग्रेसला सलग तिसऱ्यांदा एकही जागा जिंकता आली नाही.मतदारांच्या नाराजीचे मुख्य कारण हे केजरीवाल यांचे धरसोड करणारे राजकीय निर्णय असल्याचेही किशोर यांनी नमूद केले. "त्यांची धरसोडीची भूमिका, जसे की पहिल्यांदा इंडिया आघाडीशी जुळवून घेणे आणि नंतर त्यातून बाहेर पडणे, यामुळे त्यांची विश्वासार्हतेला धक्का बसला. याशिवाय अलीकडच्या काही वर्षांमध्ये त्यांची प्रशासकीय कार्यपद्धत प्रभावी ठरलेली नाही," असेही ते म्हणाले.

जन सुराज पक्षाचे प्रमुख प्रशांत किशोर यांनी यावेळी दिल्लीतील प्रशासनाच्या अपयशावर बोट ठेवले. खास करून गेल्या पावसाळ्यात दिल्लीतील सखल भागात रहाणाऱ्या नागरिकांना आलेल्या अडचणीचा मुद्दा ‘आप’च्या पराभवासाठीचे मोठे कारण ठरला, असे किशोर यांनी सांगितले. लोकांनी सहन केलेला त्रास, विशेषतः झुग्गीमध्ये राहणाऱ्यांनी सहन केलेल्या त्रासांमुळे प्रशासनातील त्रुटी अधोरेखित झाल्या आणि केजरीवाल यांचे प्रशासनाचे मॉडेल मोठ्या प्रमाणात कमजोर झाले," असे किशोर पुढे बोलताना म्हणाले. मात्र दिल्लीतील पराभव हा केजरीवाल यांच्यासाठी दिल्लीच्या पलीकडे असणाऱ्या गोष्टींवर लक्ष केंद्रीत करण्याची संधी असल्याचेही किशोर यांनी सुचित केले.या परिस्थितीला दोन बाजू आहेत. जरी दिल्लीत पुन्हा राजकीय वर्चस्व प्रस्थापित करणे ‘आप’साठी अत्यंत कठीण असेल, पण केजरीवाल आता प्रशासनाच्या जबाबदारीतून मुक्त आहेत. याचा वार केजरीवाल दुसऱ्या राज्यांमध्ये पक्षाची स्थिती मजबूत करण्यासाठी वापरू शकतात, जसे की गुजरात, जेथे ‘आप’ने गेल्या निवडणुकीत चांगली कामगिरी केली होती.

### अवघ्या 22 जागा जिंकू शकला

केजरीवाल यांनी गेल्या काही वर्षांमध्ये बदललेली राजकीय भूमिका जसे की, त्यांनी इंडिया आघाडीमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला मात्र दिल्ली निवडणूक एकट्याने लढले. यामुळे देखील दिल्ली विधानसभा निवडणुकीतील आमच्या खराब कामगिरीत भर पडली, असे प्रशांत किशोर यांनी इंडिया टुडे टीव्हीशी बोलताना सांगितले.दिल्लीत आपच्या मोठ्या पराभवाचे पहिले कारण हे गेल्या १० वर्षांमधील सत्ताविरोधी भावना (ANTI-INCUMBENCY) हे आहे. दुसरे कारण आणि कदाचित आपची सर्वात मोठी चूक ही केजरीवाल यांचा राजीनामा देणे ही होती. मद्य धोरण प्रकरणात अटक झाल्यावर त्यांनी राजीनामा द्यायला हवा होता. मात्र, जामीन मिळाल्यानंतर आणि निवडणुकीच्या तोंडावर दुसऱ्याची मुख्यमंत्री म्हणून नेमणूक करणे ही मोठी धोरणात्मक चूक ठरली," असे निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर म्हणाले. दिल्ली विधानसभा निवडणुकीत विजय मिळवत भारतीय जनता पक्ष २७ वर्षांनंतर राजधानीत सत्तेत आला आहे. भाजपने ७० पैकी ४८ जागांवर विजय मिळवला. तर आप ज्यांनी २०२० मध्ये ६२ आणि २०१५ मध्ये ६७ जागा जिंकल्या होत्या यंदा मात्र अवघ्या २२ जागा जिंकू शकला.

# दोरीने बांधून पर्यटकाला मारहाण

## चहाची टपरी आ. निलेश राणे यांच्या इशाऱ्यानंतर हटविली

। कुडाळ । महाईन्यूज

**चहा बदलून द्या म्हणून सांगितल्यावर मुंबई गोवा महामार्गावर कुडाळ जवळ झाराप झीरो पॉईंट येथे दोरीने बांधून पुण्याच्या पर्यटकाला जबर मारहाण करणाऱ्या संबंधितांवर गुन्हा दाखल करून कारवाई सुरू झाली. दरम्यान झाराप झिरो पॉईंट येथील ती टपरी आमदार निलेश राणे यांच्या इशाऱ्यानंतर पोलीस व ग्रामपंचायत प्रशासनाने हटविली.**



मुंबई गोवा महामार्गावरील कुडाळ झाराप झीरो पॉईंट येथे महामार्ग लगत असलेल्या हॉटेलमधील मालकासह त्याच्या कुटुंबीयांनी पर्यटकाला दोरीने बांधून मारहाण केली होती. या अमानुष मारहाणी बाबत समाजातून संतापाची लाट उसळली आहे. दरम्यान याबाबत आमदार निलेश राणे सुद्धा आक्रमक झाले. त्यांनी झाराप झिरो पॉईंट येथील पर्यटकांना मारहाण केली गेलेली अनधिकृत टपरी येत्या २४ तासात काढा. अन्यथा १२ फेब्रुवारी रोजी ही टपरी मी स्वतः येऊन हटवणार असा इशारा आमदार राणे यांनी प्रशासनाला दिला होता. कायदा सुव्यवस्था बिघडली तर त्याला जबाबदार पोलिस यंत्रणा राहील असेही त्यांनी म्हटले होते.

आमदार राणे यांनी प्रशासनाला इशारा दिल्यानंतर कुडाळ पोलीस ठाण्यामधून ग्रामपंचायतीला पत्र पाठविण्यात आले. आणि त्या ठिकाणाच्या ग्रामसेवकांनी तात्काळ संबंधित मालकाला नोटीस देऊन ही टपरी काढा असे सांगितले.दरम्यान कुडाळ पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी त्या ठिकाणी गेले, टपरी मालकाला सांगितले. त्याने ही टपरी काढायला तात्काळ सुरुवात केली.

### आमदार निलेश राणे सुद्धा आक्रमक

ही अनधिकृत टपरी पोलीस व ग्रामपंचायत प्रशासनाच्या माध्यमातून तात्काळ काढण्यात आली.मुंबई गोवा महामार्गावरील कुडाळ झाराप झीरो पॉईंट येथे महामार्ग लगत असलेल्या हॉटेलमधील मालकासह त्याच्या कुटुंबीयांनी पर्यटकाला दोरीने बांधून मारहाण केली होती. या अमानुष मारहाणी बाबत समाजातून संतापाची लाट उसळली आहे. दरम्यान याबाबत आमदार निलेश राणे सुद्धा आक्रमक झाले. त्यांनी झाराप झिरो पॉईंट येथील पर्यटकांना मारहाण केली गेलेली अनधिकृत टपरी येत्या २४ तासात काढा.

# सैफ शर्मिला टागोर यांच्याबद्दल काय म्हणाला?

बॉलीवूड अभिनेता सैफ अली खान नुकताच एका मोठ्या संकटातून बाहेर पडला आहे. १६ जानेवारीला सैफच्या वांद्रे येथील राहत्या घरात घुसून एका चोराने त्याच्यावर हल्ला केला होता. या हल्ल्यात रक्तबंबाळ झालेल्या सैफला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यावेळी आपल्या मुलाबद्दल ही माहिती मिळताच सैफच्या आई आणि बॉलीवूडच्या दिग्गज अभिनेत्री शर्मिला टागोर यांनीही रुग्णालयात धाव घेतली होती. आता सैफने त्याच्या एका मुलाखतीमध्ये रुग्णालयातील आईबरोबरच्या काही आठवणी सांगितल्या आहेत. सैफ अली खानवर हल्ला झाला तेव्हा आई शर्मिला टागोर या मुंबईत नव्हत्या. त्या दिल्लीला होत्या. मुलाबद्दल अशी माहिती मिळताच त्यांनी दिल्लीहून मुंबईला



धाव घेतली. नुकतीच सैफ अली खानने टाइम्स ऑफ इंडियाला मुलाखत दिली आहे. या मुलाखतीमध्ये त्याने त्याला रुग्णालयात बालपणाची आठवण आल्याचं सांगितलं आहे. तसेच आई शर्मिला यांनी त्याची कशी काळजी घेतली याबद्दल सांगितलं आहे. शर्मिला टागोर सैफ रुग्णालयात असताना सतत त्याला इतर कोणताही आजार होणार नाही, यासाठी डॉक्टरांवर कडक लक्ष ठेवायच्या.सैफने सांगितलं, "डॉक्टरांसह अन्य स्टाफने तोंडाला मास्क लावला आहे की नाही, याकडे तिचं नेहमी लक्ष असायचं, त्यामुळे मला आई जवळ असल्याने बरं होण्यासाठी खूप मदत झाली. ती सतत मला धीर देत होती. एकदा तिने माझा हात पकडला आणि मला गाणं गाऊन दाखवलं. ते गाणं म्हणजे एक अंगाई होती. आईने गायलेली अंगाई ऐकून मन भरून आलं. मी लहान होतो, त्यानंतर हे असं कधीच झालं नव्हतं."सैफ अली खानवर हल्ला झाला त्या रात्री त्याचा मुलगा इब्राहिम त्याला रुग्णालयात घेऊन आल्याची माहिती सुरुवातीला समोर आली होती. मात्र, इब्राहिम नाही तर तैमूर सैफसह रुग्णालयात गेला होता. त्याच्या या निर्णयाने आई शर्मिला टागोर त्याच्यावर ओरडतील असं त्याला वाटलं होतं.

# मी आणि दीदी नेहमी पांढऱ्या साड्या नेसायचो



वयाच्या ९१ व्या वर्षी लाखो प्रेक्षकांसमोर आजच्या काळातील लाइव्ह गाणी गाणं ही गोष्ट अजिबातच सोपी नाहीये. पण, दुबईतील कॉन्सर्टमध्ये लाइव्ह सादरीकरण करून गानसम्राज्ञी आशा भोसले यांनी तरुणपिढीसमोर एक वेगळा आदर्श निर्माण केला. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या या कॉन्सर्टची सर्वत्र तुफान चर्चा चालू होती. गेली अनेक वर्षे सातत्याने वैविध्यपूर्ण गाणी गाऊन आशा भोसले यांनी प्रेक्षकांच्या हृदयात एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे. भारतीय चित्रपटसृष्टीला लाभलेल्या या दिग्गज गायिका नुकत्याच एका पॉडकास्टमध्ये सहभागी झाल्या होत्या.आशा भोसले व लता मंगेशकर या दोन बहिणींचं नातं सुद्धा खूपच खास होतं. पण, गाणी रेकॉर्ड करताना, व्यावसायिक जगात जेव्हा या दोघींची भेट व्हायची तेव्हा लता दीदी नेहमीच सगळ्या गोष्टींचं व्यावसायिक दृष्टीकोनातून पालन होईल याकडे लक्ष द्यायच्या. उदा. औपचारिक व सौम्य बोलणं... कामाव्यतिरिक्त घरात या बहिणींमध्ये मनमोकळेपणाने संवाद व्हायचा. याशिवाय पांढऱ्या साड्या नेसायचं कारणही आशा भोसले यांनी यावेळी सांगितलं.अमृता राव आणि आरजे अनमोल यांचा पॉडकास्ट 'कपल ऑफ थिंग्ज'मध्ये आशा भोसले सहभागी झाल्या होत्या. यावेळी त्या म्हणाल्या, "मी आणि दीदी याशिवाय आमच्या इतरही बहिणी... त्या काळात आम्ही सगळ्याजणी पांढऱ्या साड्या नेसायचो. आम्हाला असं वाटायचं की, पांढरी साडी आमच्यावर शोभून दिसते.

# कौतुक करताना मनोज थांबेना!

मराठी चित्रपट, नाट्य विश्वामध्ये आपल्या अभिनयानं चाहत्यांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केलेली अभिनेत्री म्हणून अमृताचे नाव घ्यावे लागेल. केवळ हिंदी, मराठीच नाहीतर वेगवेगळ्या भाषांमधील चित्रपटांमध्ये अमृतानं केलेला अभिनय हा चाहत्यांच्या मनात घर करुन आहे. सध्या सोशल मीडियावर व्हायरल झालेला तो व्हिडिओ नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतो आहे. अमृताच्या सास बहु आचार प्रायव्हेट लिमिटेड चित्रपटाला मिळालेला पुरस्कार ही अमृतासाठी मोठी गोष्ट आहे. त्यातील भूमिकेसाठी तिला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीच्या पुरस्कारानं गौरवण्यात आले. हा पुरस्कार प्रसिद्ध अभिनेता मनोज वाजपेयीच्या हस्ते देण्यात आला. यावेळी मनोजनं अमृताचं केलेलं कौतुक सोशल

# इंटीमेट सीनवर तमन्नाचं रोखठोक उत्तर

साउथची लोकप्रिय अभिनेत्रीने जिने केवळ दाक्षिणात्य मनोरंजन विश्वापर्यंतच मर्यादित न राहता आपल्या अभिनय आणि मेहनतीच्या जोरावर बॉलिवूडमध्येही वेगळ स्थान निर्माण केलं आहे. आज तमन्ना भाटियाचा वाढदिवस. 'बाहूबली' फेम तमन्ना काही दिवसांपूर्वी लस्ट स्टोरीज या तिच्या वेबसिरिजमुळे खुपच चर्चेत आली आहे. तिने 'लस्ट स्टोरीज 2' या वेब सीरिजमध्ये काम केले आणि तिच्या इंटिमेट सीनमुळे सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. ही वेब सिरीज 29 जून रोजी OTT वर रिलीज झाली होती, ज्यामध्ये तमन्ना आणि विजय वर्मा एकत्र दिसत आहे. या सिरिजमध्येही तमन्नाने विजयसोबत अनेक इंटिमेट सीन्स आहेत. तमन्नाने या सिरिजसाठी तिची नो किंसींग पॉलिसीही तोडली होती. तिच्या या सीनची खुपच चर्चा झाली. रोमँटिक सीनमुळे तिला खुप ट्रोलही करण्यात आले आहे.आज तमन्ना भाटियाचा वाढदिवस. 'बाहूबली' फेम तमन्ना काही दिवसांपूर्वी लस्ट स्टोरीज या तिच्या वेबसिरिजमुळे खुपच चर्चेत आली आहे. तिने 'लस्ट स्टोरीज 2' या वेब सीरिजमध्ये काम केले आणि तिच्या इंटिमेट सीनमुळे सर्वांचे लक्ष वेधून घेतले.



# 'हम आपके हैं कौन' चित्रपटातील रीटाला आता ओळखूही शकणार नाही

१९९४ साली प्रदर्शित झालेल्या 'हम आपके हैं कौन' चित्रपट प्रचंड गाजला. सूरज बडजात्या दिग्दर्शित या चित्रपटाने त्या काळात बक्कळ कमाई केली. १९९४ साली सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट 'हम आपके है कौन' होता. या चित्रपटातील सलमान खानच्या प्रेम आणि माधुरी दीक्षितच्या निशा भूमिकेला प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतलं. तसंच चित्रपटातील गाण्यांनी तर प्रेक्षकांना वेडचं लावलं. आजही 'हम आपके हैं कौन' चित्रपट तितक्याच आवडीने पाहिला जातो. याच सुपरहिट चित्रपटातील रीटा सध्या काय करते तुम्हाला माहितीये का? तर, जाणून घ्या... बॉलीवूड इंडस्ट्रीमध्ये अशा बऱ्याच अभिनेत्री आहेत, ज्यांनी अभिनय क्षेत्राला रामराम केला आहे. काहींनी अपयशामुळे तर काहींनी वैयक्तिक आयुष्यावर लक्ष देण्यासाठी अभिनय क्षेत्र सोडलं आहे. त्यापैकी एक म्हणजे अभिनेत्री साहिला चड्ढा. 'हम आपके है कौन' चित्रपटात साहिला चड्ढाने रिटाची भूमिका साकारली



होती, जी चांगलीच गाजली.१९८५ साली साहिला चड्ढाने 'आय लव्ह यू' चित्रपटातून आपल्या अभिनय क्षेत्रातील करिअरला सुरुवात केली. बॉलीवूडमध्ये येण्यापूर्वी ती 'मिस इंडिया' विजेती झाली होती. १९८५ ते २०१४ पर्यंत साहिलाने 'दौलत की जंग', 'बोल राधा बोल', 'अब इंसाफ होगा', 'नमक', 'आंटी नंबर १' यांसारख्या बऱ्याच चित्रपटात काम केलं. साहिलाने अनेक मोठ्या चित्रपटात काम केलं, पण तिला कधी मुख्य भूमिका मिळाली नाही. तिच्या अभिनय क्षेत्रातील करिअरमधील सुपरहिट चित्रपट म्हणजे 'हम आपके हैं कौन'. या चित्रपटातदेखील तिने सहाय्यक अभिनेत्रीची भूमिका साकारली होती.साहिलाचा शेवटचा चित्रपट 'तुलसी' होता; जो २००८मध्ये प्रदर्शित झाला होता. यामध्ये मनीषा कोइराला आणि इरफान खान मुख्य भूमिकेत झळकले होते. त्यानंतर २०१४मध्ये ती एका शॉर्ट फिल्ममध्ये पाहायला मिळाली. ५० चित्रपट केल्यानंतर साहिलाने बॉलीवूडच्या झगमगत्या दुनियेतून एक्झिट घेण्याचा निर्णय घेतला.पुढे साहिला चड्ढाने अभिनेता निमाई बालीबरोबर लग्न केलं आणि वैवाहिक आयुष्यात ती व्यग्र झाली. दोघांना एक मुलगी आहे. साहिला सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. माहितीनुसार, अभिनेत्रीने स्वतःचं प्रोडक्शन हाउस सुरू केलं असून तिथेच काम करत आहे. या प्रोडक्शन हाउसच्या माध्यमातून वेब सीरिज आणि मालिकांची निर्मिती केली.

# शार्दुल ठाकूर पुन्हा एकदा चमकला!

## रणजी उपांत्यपूर्व फेरीत एकट्याने निम्मा संघ केला बाद

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**शार्दुल ठाकूर रणजी ट्रॉफी २०२४-२०२५मध्ये आपल्या अष्टपैलू कामगिरीमुळे चर्चेत आहे. गोलंदाजी आणि फलंदाजीतही शार्दुलने उत्कृष्ट कामगिरी करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. आता पुन्हा एकदा शार्दुल ठाकूरच्या भेदक गोलंदाजीची झलक पाहायला मिळाली. मुंबई संघाचा रणजी ट्रॉफीमधील उपांत्यपूर्व फेरीचा सामना हरियाणाविरूद्ध खेळवला जात आहे. या सामन्यात शार्दुलने भेदक गोलंदाजी करत ६ विकेट्स आपल्या नावे केले.**




उपांत्यपूर्व फेरीतील सामन्यात मुंबईचा संघ प्रथम फलंदाजी करताना ३१५ धावा केल्या. मुंबईची टॉप फलंदाजी फळी अपयशी ठरल्यानंतर अजिंक्य रहाणे ३१ धावा, शम्स मुलानी ९१ धावा आणि तनुष कोटियनच्या ९६ धावांच्या खेळीच्या जोरावर मुंबईने ३०० धावांचा टप्पा पार केला. यानंतर प्रत्युत्तरात हरियाणाचा कर्णधार अंकित कुमारने १३६ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. पण त्याच्याशिवाय इतर कोणत्याच फलंदाजाला मुंबईच्या गोलंदाजांनी टिकू दिले नाही.उजव्या हाताच्या अष्टपैलू शार्दुल ठाकूरने हरियाणाविरुद्ध एकट्याने ६ फलंदाजांना माघारी धाडलं. ठाकूरने १८.५ षटकांत केवळ ५८ धावा देत ६ विकेट घेतले. मोठी गोष्ट म्हणजे शार्दुल ठाकूरने अतिशय भेदक गोलंदाजी केली. त्याने १८.५ षटकांत ८२ चेंडूत एकही धाव दिली नाही. शार्दुल ठाकूर हा हरियाणाविरुद्ध लक्ष्य दलालचा पहिला बळी ठरला. यानंतर त्याने रोहित प्रमोद शर्माला बाद केलं. अवघ्या काही वेळातच त्याने हरियाणाच्या खालची फळी पूर्णपणे उद्ध्वस्त केली. या खेळाडूने अनुत ठकराल, जयंत यादव, अंशुल कंबोज आणि अजित चहल यांनाही बाद केले. ठाकूरने नेहमीच रणजी ट्रॉफीमध्ये चमकदार कामगिरी केली आहे. या सामन्यातही एकेकाळी हरियाणा मोठ्या आघाडीच्या मार्गावर होता, पण ठाकूरने शानदार गोलंदाजी करत मुंबईला १४ धावांची महत्त्वपूर्ण आघाडी मिळवून दिली.शार्दुल ठाकूरने या रणजी मोसमात आतापर्यंत ३२ विकेट घेतल्या आहेत. या मोसमात त्याने प्रथमच एका डावात पाच विकेट्स घेण्याचा पराक्रम केला आहे. एवढेच नाही तर ठाकूरने बॅटनेही कमालीची कामगिरी केली आहे. या खेळाडूने ४४ च्या सरासरीने ३९६ धावा केल्या आहेत ज्यात ३ अर्धशतकं आणि एक शतक आहे. सध्या मुंबईचा संघ दुसऱ्या डावात फलंदाजी करत असून अजिंक्य रहाणे ८८ धावा आणि शिवम दुबे ३० धावांवर खेळत आहे. तर सलामीवीर आयुष म्हात्रेने ३४ धावांची, सिद्धेश लाडने ४३ धावांची खेळी केली. तर भारताच्या टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव ज्याची बॅट गेले काही आंतरराष्ट्रीय सामने शांत होती, त्यालाही अखेरीस सूर गवसला आणि त्याने रणजी सामन्यात ८६ चेंडूत ८ चौकार आणि २ षटकारांसह ७० धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. यासह मुंबईचा संघ आता २९२ धावांनी पुढे आहे.मुंबईची टॉप फलंदाजी फळी अपयशी ठरल्यानंतर अजिंक्य रहाणे ३१ धावा, शम्स मुलानी ९१ धावा आणि तनुष कोटियनच्या ९६ धावांच्या खेळीच्या जोरावर मुंबईने ३०० धावांचा टप्पा पार केला. यानंतर प्रत्युत्तरात हरियाणाचा कर्णधार अंकित कुमारने १३६ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. पण त्याच्याशिवाय इतर कोणत्याच फलंदाजाला मुंबईच्या गोलंदाजांनी टिकू दिले नाही.उजव्या हाताच्या अष्टपैलू शार्दुल ठाकूरने हरियाणाविरुद्ध एकट्याने ६ फलंदाजांना माघारी धाडलं. ठाकूरने १८.५ षटकांत केवळ ५८ धावा देत ६ विकेट घेतले. मोठी गोष्ट म्हणजे शार्दुल ठाकूरने अतिशय भेदक गोलंदाजी केली. त्याने १८.५ षटकांत ८२ चेंडूत एकही धाव दिली नाही.शार्दुल ठाकूर हा हरियाणाविरुद्ध लक्ष्य दलालचा पहिला बळी ठरला.

अवघ्या काही वेळातच त्याने हरियाणाच्या खालची फळी पूर्णपणे उद्ध्वस्त केली. या खेळाडूने अनुत ठकराल, जयंत यादव, अंशुल कंबोज आणि अजित चहल यांनाही बाद केले. ठाकूरने नेहमीच रणजी ट्रॉफीमध्ये चमकदार कामगिरी केली आहे. या सामन्यातही एकेकाळी हरियाणा मोठ्या आघाडीच्या मार्गावर होता, पण ठाकूरने शानदार गोलंदाजी करत मुंबईला १४ धावांची महत्त्वपूर्ण आघाडी मिळवून दिली.शार्दुल ठाकूरने या रणजी मोसमात आतापर्यंत ३२ विकेट घेतल्या आहेत. या मोसमात त्याने प्रथमच एका डावात पाच विकेट्स घेण्याचा पराक्रम केला आहे. शार्दुल ठाकूर रणजी ट्रॉफी २०२४-२०२५मध्ये आपल्या अष्टपैलू कामगिरीमुळे चर्चेत आहे. गोलंदाजी आणि फलंदाजीतही शार्दुलने उत्कृष्ट कामगिरी करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. आता पुन्हा एकदा शार्दुल ठाकूरच्या भेदक गोलंदाजीची झलक पाहायला मिळाली. मुंबई संघाचा रणजी ट्रॉफीमधील उपांत्यपूर्व फेरीचा सामना हरियाणाविरूद्ध खेळवला जात आहे.

# दक्षिण आफ्रिकेच्या मॅथ्यू ब्रिट्झकेचा वर्ल्ड रेकॉर्ड

## वनडे पदार्पणात ‘ही’ कामगिरी करणारा जगातील पहिला खेळाडू

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ पूर्वी सध्या पाकिस्तानमध्ये तीन संघांमध्ये तिरंगी मालिका खेळवली जात आहे. यामध्ये पाकिस्तानशिवाय न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका हे संघ सहभागी झाले आहेत. दरम्यान, दक्षिण आफ्रिकेच्या मॅथ्यू ब्रिट्झकेने अशी कामगिरी केली आहे, जी कोणत्याही फलंदाजासाठी अगदी स्वप्नवत असते.**




दक्षिण आफ्रिका संघाकडून त्याला पदार्पणाची संधी मिळाली आणि पदार्पणातच त्याने शतक झळकावले आहे. फक्त शतक झळकावून तो थांबला नाही १५० धावांची मोठी खेळी करत त्याने विश्वविक्रम केला आहे.मॅथ्यू ब्रिट्झकेने वनडेमध्ये पदार्पण करताना सर्वोच्च धावसंख्या नोंदवली. पहिल्याच एकदिवसीय सामन्यात त्याने १५०धावा केल्या, त्याआधी जगातील कोणत्याही फलंदाजाला अशी कामगिरी करता आली नव्हती. त्याने जवळपास ४७ वर्षे जुना विश्वविक्रम मोडीत काढला आहे. मॅथ्यू ब्रिट्झके हे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील नवीन नाव आहे, तो दक्षिण आफ्रिकेसाठी टी-२० आंतरराष्ट्रीय आणि कसोटी सामने खेळला आहे, परंतु आज त्याने प्रथमच वनडेसाठी मैदान पाऊल ठेवले. त्याला कर्णधार टेम्बा बावुमासह सलामीची संधी मिळाली. मात्र, संघाची धावसंख्या केवळ ३७ धावांवर असताना टेम्बा बावुमा केवळ २० धावा करून बाद झाला.

### मॅथ्यू ब्रिट्झकेचा वर्ल्ड रेकॉर्ड

मॅथ्यूने आधी आपलं शतकं झळकावलं आणि त्यानंतर दक्षिण आफ्रिकेसाठी पदार्पणात सर्वात मोठी धावसंख्या उभारणारा खेळाडू ठरला.दक्षिण आफ्रिकेकडून पदार्पणात वनडे शतक झळकावणारे फक्त तीन फलंदाज होते, पण आता त्यांची संख्या आता चार झाली आहे. कॉलिन इंग्रामने २०१० मध्ये झिम्बाब्वेविरुद्ध पदार्पण केले, तेव्हा त्याने १२४ धावांची शानदार खेळी खेळली होती. यानंतर टेम्बा बावुमाने २०१६ मध्ये आयर्लंडविरुद्ध पदार्पण केले आणि ११३ धावांची उत्कृष्ट खेळी खेळली. या यादीत तिसरे नाव आहे रीझा हेंड्रिक्सचे. त्याने २०१८ मध्ये श्रीलंकेविरुद्धच्या त्याच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात ०१२ धावा केल्या होत्या.


शिवांजली
सखी मंच
महिलांचे हक्काचे व्यासपीठ...
इंद्रायणी थडी
आमदार महेशदादा लांडगे यांच्या संकल्पनेतून
शिवांजली सखी मंच आयोजित
इंद्रायणी थडी 2025
दि. 27, 28 फेब्रुवारी व 1, 2 मार्च 2025 रोजी
सकाळी 10 ते रात्री 10
हिंदूभूषण छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र, पुणे-नाशिक रोड, मोशी (पिंपरी-चिंचवड)
महाराष्ट्रातील सर्वात मोठा जत्रोत्सव, पिंपरी-चिंचवडमध्ये!


Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!



DP Enterprises
one call problem solve
PEST CONTROL
ELECTRICIAN
PAINTING
PLUMBING
All Maintenance Services
Pimpri-Chinchwad, Pune.
PRICE
QUALITY
SERVICE
we provide all types of home services.
CONTACT :- 86000 60593 / 99214 66191


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact : 9657767000 / 9370493922

# विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने जिंकली मने!

## शिक्षण विश्व; न्यु पुणे पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी

**चिंचवड एज्युकेशन सोसायटीच्या न्यू पुणे पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांचे विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम पार पडले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या कलेतून उपस्थितांची मने जिंकली.**

चिंचवड एज्यूकेशन सोसायटीच्या न्यू पुणे पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन प्राधिकरण मधील, ग. दि. माडगुळकर नाट्यगृह येथे मागील दोन दिवसांत मोठ्या उत्साहात पार पडले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन जी. के. गुरुकुलच्या डायरेक्टर ज्योती जैसवाणी यांच्या हस्ते करण्यात आले. स्नेहसंमेलनात पहिल्या दिवशी इयत्ता ५वी ते वीच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमामध्ये वार्षिक पारितोषिक वितरण समारंभासह विविध स्पर्धांमध्ये नावीन्य प्राप्त विदयार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विविध गुणदर्शनातून सर्व पालकांचे मनोरंजन करण्यात आले.

स्नेहसंमेलनात् दुसऱ्या दिवशी युकेजी ते ४ थी च्या विदयार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे पिंपरी चिंचवड पालिकेचे निलेश भदाणे , संस्थेचे सचिव, प्रदिपकुमार खंदारे, संस्थेच्या विश्वस्तू ॲड. अमृता खंदारे, स्कूलच्या प्राचार्या आदींसह शिक्षक, पालक, हितचिंतक व विदयार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मानव जातीच्या कल्याणासाठी AI चा वापर शक्य

## वनडे पदार्पणात 'ही' कामगिरी करणारा जगातील पहिला खेळाडू

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी

**चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज च्या वतीने महाविद्यालयात ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन 2025 हे वर्ष कृत्रिम बुद्धिमत्ता वर्ष जाहीर केल्या प्रित्यर्थ कृत्रिम बुद्धिमत्ता (ए आय ) सर्वांसाठी यात कृत्रिम बुद्धिमत्ता रोबोट्स कसे काम करते ,त्याच्या प्रभावी वापर कसा करता येईल यासाठी फेसबुक व युट्यूबवर थेट प्रक्षेपणाद्वारे एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले.**

कृत्रिम कृत्रिम बुद्धिमत्तेचे तज्ञ व व्याख्याते नाशिक येथील प्रा. किरणकुमार जोहरे यांच्या हस्ते रिमोट द्वारे विद्युत दीप प्रज्वलना द्वारे एकदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले .याप्रसंगी व्यासपीठावरती प्राचार्य डॉ. ए. के. वाळुंज, उपप्राचार्या डॉ क्षितिजा गांधी, कार्यशाळेच्या समन्वयिका डॉ राजश्री ननावरे याच्यासमवेत ऑनलाईन सुमारे 3500 विद्यार्थी व महाविद्यालयाचे 115 प्राध्यापकांनी सहभाग या एक दिवसीय कार्यशाळेत नोंदविला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . ए के वाळुंज यांनी व्याख्याते प्रा . किरणकुमार जोहरे यांचा शाल , स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला.

व्याख्याते प्रा किरणकुमार जोहरे मार्गदर्शन करताना पुढे म्हणाले, जगभरात बदलणाऱ्या तंत्रज्ञानानुसार आपल्यात देखील बदल घडवुन आणला पाहिजे. त्यासाठी आपली विचारसरणी देखील बदलावी लागेल. ही काळाची देखील गरजच आहे. आपल्याला कृत्रिम बुद्धिमत्ता (एन आय ) रोबोट्सच्या नैतिक आणि शाश्वत वापरासाठी धोरणे तयार करावी लागतील. याद्वारे पीक उत्पादनासाठी स्वयंचलित कृषी उपकरणे आणि हवामानाच्या परिणामाच्या अनुमान बांधता येईल. कृषी उत्पन्न वाढीस मदतच होणार आहे. आज अनेक उद्योगांमध्ये अचूक उत्पादन निर्मिती आज रोबोटसचा वापर करण्यात येत आहे. रोबोट्स वैद्यकीय क्षेत्रात शस्त्रक्रिया करताना वापरात येत आहे .

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. ए. के. वाळुंज यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता ( ए आय) रोबोट्स भावी पिढीसाठी कसे उपयुक्त आहे याची सर्वीस्तर माहिती विशद केली. प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी हे नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याचे आवाहनही केले . भविष्यात उपयोगी पडेल असे भाकितही त्यानी व्यक्त केले . डॉ. जयश्री मुळे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. एक दिवशीय कार्यशाळा कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा रसिका पाटील यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ रूपा शहा यांनी करुन दिला तर आभार कार्यशाळेच्या समन्वयीका डॉ राजश्री ननावरे यांनी मानले .




### उपस्थितांच्या शंकांचे निरसन...

अवकाश संशोधनासाठी मंगळ आणि चंद्रावरही पोहोचले आहे. प्राध्यापकांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, समजून घेवून विधायक पद्धतीने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम करू शकतील. आज शाळा महाविद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्ता (एन आय) रोबोट्स तंत्रज्ञान येऊ पाहत आहे. भविष्यात कदाचित प्राध्यापकाची जागा रोबोटस घेऊ शकतील. महाराष्ट्रात उद्योग क्षेत्रात व काही हॉटेलमध्ये वेटरचे काम रोबोट्स करू लागले आहे. चीनमध्ये वकिलीक्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता चे रोबोट्स काम करू लागले परंतु तेथील वकिलांनी त्याचा विरोध केला आहे. अमेरिकेतही चित्रपट कथा, पटकथा लेखनाचे काम रोबोट्स करीत आहे. तेथेही तेथील चित्रपट लेखकांचा विरोध होत आहे .प्रा किरणकुमार जोहरे यांनी या टूलचा वापर कृत्रिम बुद्धिमत्तात कसा केला जातो, याची सर्वीस्तर माहिती देऊन उपस्थितांच्या शंकांचे समर्पकपणे निरसन केले.

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI


PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education

EDUCATING **MIND & HEART**

## ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26

# Holistic Empowering Learning

IT ALL **STARTS HERE**



**42** YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION

**55+** NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS

**11+** CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA

**17K+** 17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES

**600+** TEACHING AND NON TEACHING STAFF

**13K+** 13,000 ALUMNI ACROSS GLOBE

**PRIYADARSHANI** GROUP OF SCHOOLS

BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA

+91 8668755826

alandi@priyadarshanischools.org

www.priyadarshanischools.org